ISSN: 2348-1390

# NEW MAN

## INTERNATIONAL JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES

VOL 5 ISSUE 9 SEPTEMBER 2018

A PEER REVIEWED AND INDEXED E-JOURNAL

IMPACT FACTOR: 4.321 (IIJIF)

*Editor-in-Chief*

**Dr. Kalyan Gangarde**

*Editor*

**Dr. Sadhna Agrawal**

NEW MAN PUBLICATION

PARBHANI (MAHARASHTRA)

Contact: +91 9420079975 +91 9730721393 nmpublication@gmail.com

ISSN: 2348-1390
Impact Factor: 4.321 (IIJIF)

| | |
|---|---|
| **Full Journal Title:** | NEW MAN INTERNATIONAL JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES |
| **FREQUENCY:** | MONTHLY |
| | |
| **Language:** | ENGLISH, HINDI, MARATHI |
| | |
| **Journal Country/Territory:** | INDIA |
| | |
| **Publisher:** | New Man Publication |
| | |
| **Publisher Address:** | New Man Publication<br>Ramdasnagar, Parbhani -431401<br>Mob.0 9730721393 |
| | |
| **Subject Categories:** | LANGUAGES, LITERATURE, HUMANITIES , SOCIAL SCIENCES & OTHER RELATED SUBJECTS |
| | |
| **Start Year:** | 2014 |
| | |
| **Online ISSN:** | 2348-1390 |
| **Impact Factor:** | **4.321 (IIJIF)** |
| | |
| **Indexing:** | Currently the journal is indexed in:<br>Directory of Research Journal Indexing (DRJI),<br>International Impact Factor Services (IIFS)<br>Google Scholar |

**NMIJMS DISCLAIMER:**

The contents of this web-site are owned by the NMIJMS and are only for academic publication or for the academic use. The content material on NMIJMS web site may be downloaded solely for academic use. No materials may otherwise be copied, modified, published, broadcast or otherwise distributed without the prior written permission of NMIJMS.

Academic facts, views and opinions published by authors in the Journal express solely the opinions of the respective authors. Authors are responsible for their content, citation of sources and the accuracy of their references and biographies/references. The editorial board or Editor in chief cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights.

# CONTENTS

1. Diasporic Element In Bharathi Mukherjee's Wife I Mrs. K. Kavitha & Prof. M. Amalraj
2. Marital Relationship In Mohan Rakesh's *Halfway House* : A Subversion Of The Social Ethos I Dr Binu Anitha Joseph
3. Characters Of Arundhati Roy's Novels I Unnikrishnanatiyodi PM
4. Poverty Reduction Of Self Help Group In Financial Inclusion I Varma Kirankumari
5. Mahatma Gandhi: An Idol For The Writers In Indian Literature In English I Mr. Mundhe Ramakant D.
6. Women Empowerment: A Universal Urgency I Nadeem Nisar
7. Comparative Study Of the Effect Of Chemical Fertilizer and Organic Fertilizer : A Case Study Of South 24 Parganas, India I Mandira Shaw
8. Scheduled Castes And Restrictions I Kashide Yadav M.& Dr. Chavan Yashwant B.
9. भारत में शिक्षा का अधिकार | संतोष कुमार मिश्र
10. भारत पाक संबंध : भारतीय प्रतिरक्षा के विशेष संधर्भ में | डॉ. विष्णू कांत शर्मा
11. महाराष्ट्रातील डाळींब उत्पादन, विपणन व निर्यातीचा अभ्यास | पठाण दस्तगीर रमजान
12. आदिवासी समाजाच्या विकासात आदिवासी कार्यकारी सहकारी संस्थांची भूमिका | प्रा. गजानन अमृता भुरके
13. अनुदानीत शैक्षणिक संस्थामधील महिला कर्मचा-यांच्या आर्थिक व सामाजिक समस्या आणि उपाय योजना | प्रा. सौ. व्ही.भूतडा
14. भारतीय समाजातील नक्षलवादी चळवळीचा उदय व विकास | यादव परमेश्वर दत्ताराव
15. नासिरा शर्मा के 'शाल्मली' उपन्यासों में स्त्री संघर्ष | के. विजयकुमारी
16. सांगली जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादन आणि विपणनाचा अभ्यास | पंदरकर बाबासाहेब रघुनाथ

13.

# अनुदानीत शैक्षणिक संस्थामधील महिला कर्मचा-यांच्या आर्थिक व सामाजिक समस्या आणि उपाय योजना

**प्रा. सौ. व्ही.भूतडा**
अधिव्याख्याता वाणिज्य विभाग
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
गगाखेड जि. परभणी.

प्राचीन काळापासून स्त्रिया आर्थिक कार्यात पुरूषांना सहकार्य करित होत्या. रानटी अवस्थेत असतांना पुरूषांनी आणलेली शिकार साफ करणे, भाजणे इत्यादी कार्य स्त्रिया करायच्या. कंदमुळे फळ गोळा करण्याचे काम स्त्रिया करित. शेती अवस्थेत स्त्रियांचा अर्थार्जनातील सहभाग महत्वाचा झाला. आजही ग्रामीण भागात शेतातील कामे स्त्रिया करतात. औद्योगिकरण ,नागरीकरण ,आधूनिकीकरण, शिक्षणाचा प्रसार, नवीन सामाजिक मूल्ये समाजसूधारकाचे कार्य इत्यादी कारणामुळे स्त्रियांचा पारंपारिक दर्जा आणि भूमिकामध्ये बराच बदल आहे. मुली शिक्षण घेऊ लागल्यात. शिक्षणात त्या पुढे आल्यात त्यामुळे त्यांच्यात स्वाभिमान स्वतंत्र अस्तित्व,इच्छा, आकांक्षा निर्माण झाल्या शिक्षणामुळे त्या नोकरीच्या क्षेत्रात आल्या. विविध क्षेत्रात त्या नोकरी करतांना आढळतात. नाकरी करीत असल्यामुळे आर्थिक दृष्टया त्या स्वतंत्र झाल्या.

भारतात नोकरी किंवा काम करणाऱ्या स्त्रियांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. शेती, शेतमजुरी, बागकाम, खाणकाम उत्पादन प्रक्रिया बांधकाम ,व्यापार ,वाहतूक,शिक्षण,शासकीय कार्यालय , विक्रेते ,पोलिस या सर्व क्षेत्रात स्त्रिया काम किंवा नोकरी करून अर्थार्जन करीत आहेत. १९५१ मध्ये ४ कोटी, १९६१ कोटी स्त्रिया काम किंवा नोकरी करीत होत्या. १९८१ ते १९९१ या दशकात नोकरी करणाऱ्या स्त्रियाच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. वर्तमान काळात स्त्रियांनी अर्थार्जन करणे आवश्यक मानले जाते.

स्त्रियांनी नोकरी करणे ही आजची गरज आहे. असे असलेतरी नोकरी करणाऱ्या स्त्रियांना एकाच वेळी दोन भूमिका पार पाडाव्या लागतात. पहिली भूमिका ही कुटूंबाच्या संदर्भात आहे. कुटूंबात स्त्री ही पत्नी, आई, सून असते. त्यानूसार तिला आपली भूमिका करावी लागते. तर ती नोकरी करीत असल्यामुळे कार्यालयात किंवा महाविद्यालयात किंवा जिथे काम करीत असेल तेथील भूमिकेनुसार कार्य करावे लागते. म्हणजेच नोकरी करणाऱ्या स्त्रियांना कुटूंबातील भूमिका पार पाडाव्या लागतात.

**उद्दिष्टे**

१ अनुदानीत शैक्षणिक संस्थामधील महिला कर्मचा-यांच्या आर्थिक समस्या अभ्यासणे
२ अनुदानीत शैक्षणिक संस्थामधील महिला कर्मचा-यांच्या सामाजिक समस्या अभ्यासणे
३ अनुदानीत शैक्षणिक संस्थामधील महिला कर्मचा-यांच्या इतर समस्या अभ्यासणे
४ अनुदानीत शैक्षणिक संस्थामधील महिला कर्मचा-यांच्या समस्येवरील उपाय योजना अभ्यासणे

**अनुदानीत शैक्षणिक संस्थामधील महिला कर्मचा-यांच्या आर्थिक समस्या**

१) स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्यामुळे कौटुंबिक तणाव
२) पैसा खर्च करण्याचे स्वातंत्र्य नाही
३) कुटुंबातील व्यक्तींच्या अपेक्षा
४) विभक्त कुटुंबात वाढ होते

५) मालमत्तेचे हस्तांतरण होते
६) उच्च जीवनमानाची अपेक्षा
७) पुरुषप्रधान समाजात महत्वाच्या निर्णयाचे अधिकार पुरुषांकडेच असतात
८) लिंगभेद
९) महिला शिक्षिकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन समाजाचा व घरी राहणाऱ्या इतर स्त्रियांचा म्हणावा तितका सकारात्मक नाही. त्यामुळे त्यांना शाळा व महाविद्यालयात नोकरी करतांना तारेवरची कसरत करावी लागते.
१०) महिला शिक्षिकांना आपल्या घरच्या अनुउपस्थितीची भरपाई करण्यासाठी तिला अनेक उपाय योजावे लागतात. उदा. सुट्टिच्या दिवशी मुलांना भावनिक दृष्ट्या जास्त खाद्य पुरविणे, घरातील सदस्यांची मर्जी राखण्यासाठी विशेष मेहनत घेणे . आपल्या व्यक्तीमत्वाला वेगवेगळा आकार देउन जो अनेकदा स्वभाव सुलभ नसतो.
११) वाढती महागाई
१२) उत्पन्नापेक्षा खर्च जास्त
१३) परावलंबीलत्व
१४ कामाच्या बदल्यात दिले जाणारे वेतन

**अनुदानीत शैक्षणिक संस्थामधील महिला कर्मचा-यांच्या सामाजिक समस्या**

१) वैवाहिक जीवनात असमाधान
२) वाढत्या महत्वाकांक्षामुळे तणात
३) पत्नी विषयी संशयाची भावना
४) मूलांकडे दुर्लक्ष
५) कुटुंबाकडे दुर्लक्ष
६) सासु सास-याशी संघर्ष
७) घटस्फोटाची समस्या
८) नोकरीच्या ठिकाणी समस्या
९) महिला शिक्षिकांना नोकरीच्या गावात राजकीय नेते व गावातील गटबाजीचा त्रास सहन करावा लागतो
१०) आरोग्य विषयक समस्या

महिला शिक्षिका किंवा नोकरी करणाऱ्या इतर महिलांमध्ये आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात. त्यामध्ये प्रामुख्याने ताण, निरूत्साह, डोकेदुखी, भुकेचा आभाव, झोप न येणे, पाठदुखी, अनियमित मासिक पाळी इत्यादी समस्यांना महिला सामोरे जातांना दिसतात.

**अनुदानीत शैक्षणिक संस्थामधील महिला कर्मचा-यांच्या इतर समस्या**

१) शाळा महाविद्यालयाचे अंतर
२) शैक्षणिक संस्थाचे ठिकाण
३) शैक्षणिक संस्थाकडून दिली जाणारी वागणूक
४) कमी विश्रांती
५) सामाजिक संबंधात दुरावा निर्माण होतो
६) अति कामामुळे येणारा थकवा
७) वर्गातील वातावरण
८) विद्यार्थ्यांचे वर्तन
९) सुरक्षिततेचा अभाव
१०) वरिष्ठाकडून मिळणारी वागणूक
११) संस्थेमध्ये उपलब्ध साधनसामग्रीचा अभाव

१२) असमान वागणूक
१३) विश्रांतीगृहाची अनुउपलब्धता
१४) स्वतंत्र शौचालय नाही
१५) पिण्याच्या पाण्याचा प्रश्न
१६) आरोग्य विषयक सुविधांची कमतरता
१७) स्त्रियांना त्यांच्या जबाबदा-या, अधिकार , कायदे यांची आजही परिपूर्ण माहिती नाही त्यामुळे त्यांच्या समस्यांची उकल लवकर होउ शकत नाही.
१८) जीवनावश्यक वस्तुची उपलब्धता तातडीने न होण्याची समस्या
१९) संशयाच्या भावनेतुन कलह निर्माण होतो

**अनुदानीत शैक्षणिक संस्थामधील महिला कर्मचा-यांच्या समस्येवरील उपाय योजना**

१) महिला शिक्षीकेंनी अधिकाधिक शिक्षण घेऊन आपल्या नोकरीमध्ये प्रगती करावी. जेणेकरून त्यांना अधिकाधिक विकास होण्यास मदत होईल.
२) महिला शिक्षिकेंनी नोकरी सांभाळून आपल्या कुटूंबाकडे सूद्धा लक्ष द्यावे. कुटुंबाकडे दुर्लक्ष करू नये.
३) नोकरी करणाऱ्या स्त्रियांनी स्वतःच्या स्वास्थ्याकडे सुद्धा अधिक लक्ष दिले गेले पाहिजे.
४) शिक्षक म्हणून कार्य करणाऱ्या स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य असल्याने आपल्या कुटुंबाचे आर्थिक नियोजन व्यवस्थित पध्दतीने करून आपल्या कुटुंबाचा विकास करण्यावर भर द्यावा.
५) महिला शिक्षिकांमध्ये घटस्फोटाचे प्रमाण अधिक असल्याने तो टाळण्यासाठी आपल्या कुटुंबात संघर्ष होणार नाही याकडे लक्ष द्यावे.
६) नोकरी करणाऱ्या स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी त्यांना नोकरीत प्राधान्य द्यावे. व त्यांना समान संधी उपलब्ध करून द्यावी.
७) महिला शिक्षिकेंना सामाजिक संघटनेत सहभागी करून घेऊन त्यांना समाजकार्य करण्यास उत्तेजित करावे.
८) नोकरी करणाऱ्या स्त्रियांनी सामाजिक कार्य करावे यासाठी समाजाने त्यांना अनुकूल वातावरण तयार करून द्यावे. तसेच शासनाने व समाजाने त्यांना पुरस्कृत करावे.
९) महिला शिक्षिकांचा त्यांच्या कार्याला अनुसरून शासनाने व समाजाने त्यांचा गौरव करावा. त्यावरून इतर महिला कर्मचारी वर्गाला प्रेरणा मिळेल.
१०) नोकरी करणाऱ्या स्त्रियांना समाजाने महिला मंडळात सहभागी करून अधिक विविध प्रकारची मंडळे स्थापण करून स्त्रियांचा विकास साधून आणावा.
११) महिला शिक्षिकेंना त्यांच्या पतीनेही सहकार्य करावे व त्यांच्या कार्यस हातभार लावून त्यांचा आत्मविश्वास वाढवावा. नोकरी करणाऱ्या स्त्रियांकडे पाहण्याचा नकारात्मक दृष्टिकोन समाजाने बदलावा व त्यांना सामाजिक दर्जा प्राप्त करून देण्यास उत्तेजित करावे.
१२) महिला शिक्षिकांना समाजाने आदर, सन्मान, आपुलकी व मान द्यावा.
१३) महिला शिक्षिकांना कायदेविषयक माहिती द्यावी. महिलांची कायद्या संबंधी जागृकता वाढावी ह्यासाठी कायदेविषयक सल्ला देणारी केंद्रे किंवा माहिती शैक्षणिक संस्थामध्ये ठेवावी.
१४) महिला शिक्षिकांना कायदेविषयक संरक्षण द्यावे.
१५) ग्रामीण विभागातील शाळेतील महिला शिक्षिकांना पदोन्नती लवकर द्यावी. कारण त्या ग्रामीण भागात कार्य करतात.

**निष्कर्ष**

भारतीय स्त्री अजूनही स्थित्यंथरा मधून जात आहे व विकसित देशातील स्त्रीपेक्षा अजूनही बरीच मागे आहे व या गोष्टीस पुरूषी अहंकार, चूल व मूल ह्या जून्या संकल्पना घेवून चालणारा समाज हे आहेत. मुळात स्त्रीच आधुनिकीकरण हे जुन्या पिढीस आपल्या संस्कृतीवर आक्रमण वाटत नाही पण तीच पिढी आधुनिक पुरुषाला सहज स्वीकारते तर स्त्रियांना जुन्य

संकल्पनेच्या आधारे बांधून बरेच पुरूष आपला स्वार्थ साधतांना दिसतात व त्यासच ते पुरूषार्थ समजतात. स्त्री जर नोकरी करणारी असेल तरीही तिच्याकडून जास्तीत जास्त घरकामाची अपेक्षा ठेवली जाते. म्हणजेच चूल,मूल व नोकरी ह्या तिहेरी भूमिका तिला धावपळ करत साभाळाव्या लागतात. जरी दुहेरी मार्गाने घरात उत्पन्न येत असेल तर तरीही पूर्णवेळ घरकाम मोलकरणीस देऊन अजून एका स्त्रीला रोजगारापासून दूर ठेवण्यात येत. बऱ्याच घरात स्त्रीला शिक्षण घेऊन सुद्धा नोकरी करू दिली जात नाही व तिला स्वनिर्मित अस्तित्व व स्वाभिमानी आयूष्यापासून दूर ठेवल जात व तिच ज्ञान चार भिंतीच्या आत सडवल जात.

स्त्रिया नोकरी करीत असल्या तरी कुटूंबातील स्त्रीच्या भूमिकेविषयी दृष्टिकोन बदलेला नाही. स्त्रीने पत्नी आई , सुन म्हणून भूमिका पार पाडावी अशी कुटुंबातील लोकांची आणि समाजाची अपेक्षा असते. त्याचा परिणाम त्यांच्या वैवाहिक आणि कौटंबिक जीवनावर होतो. म्हणून नोकरी करणा-या स्त्रियांच्या विविध समस्या निर्माण झाल्या आहेत.

( The present paper is based on primary data only)

❑❑❑